सन २०१९-२० करिता आदिम जमाती विकास योजने अंतर्गत “DharaMitra- Developing livelihood opportunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing” या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१८/प्र.क्र. ७२/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ३१/०८/२०१९

संदर्भ-

१.जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९

२. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०४(१९)/२०१९/ PVTG , दि.३०/०५/२०१९(२ पत्रे)

३. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय -२०१९/प्र.क्र. ६३ /का.-१९ दि.२९/०६/२०१९

प्रस्तावना -

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व आदिम जमाती विकास कार्यक्रम या योजना अंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते . या योजना अंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छानननी व निवड प्रक्रिया राबवून निवडक प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावामध्ये धरामित्र संस्थेच्या प्रस्तावाचा समावेश आहे. प्रस्ताव मुख्यत्वे वर्धा जिल्ह्यातील वर्धा व आर्वी तालुक्यात असणा-या कोलाम या आदिम जमातीच्या कुटुंबांना कुक्कुटपालन आणि शेळीपालनासारखी उपजीविकेची माध्यमे उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे याबाबत आहे.

२ राज्यात सद्यस्थितीत कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड ह्या तीन विशेष असुरक्षित जनजाती (आदिम जमाती) आहेत. कोलम समाज प्रामुख्याने यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, इ. जिल्ह्यात आढळतो.कुपोषण, रोगराई, बालमृत्यू, बेरोजगारी यासारखे अनेक प्रश्न या आदिम समाजापुढे आहेत. वर्धा जिल्ह्यातील कोलाम समाज उपजीविकेसाठी प्रामुख्याने वने आणि पावसाळी शेतीवर अवलंबून आहे. तसेच कुक्कुटपालन आणि शेळीपालनासारखे उपजीविकेची माध्यमे उपलब्ध आहेत तथापि कुक्कुटपालन किंवा शेळीपालन करण्यासाठी लागणारे योग्य व्यवस्थापन, अनुकूल वातावरण, खुराक, योग्य बाजारभाव इ. चा अभाव दिसून येतो. सदर समस्यांवर सुधारित शास्त्रीय पद्धतीने कालबद्ध कार्यक्रम राबविल्यास कोलाम कुटुंबियांच्या उत्पनामध्ये वाढ होऊ शकते ह्या दृष्टीकोनातून धरामित्र संस्थेने “DharaMitra- Developing livelihood opportunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing” हा रुपये ९८.५६ लक्ष किमतीचा प्रस्ताव वर्धा जिल्ह्यातील आदिम जमाती असणा-या वर्धा व आर्वी तालुक्यात राबविण्याबाबत शासनास सादर केला होता.

३ वर्धा जिल्ह्यात असणा-या कोलाम या आदिम जमतीच्या कुटुंबीयांना कुक्कुटपालन आणि शेळीपालन सारखी उपजीविकेची माध्यमे उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाने जनजाती कार्य मंत्रालय भारत सरकार समोर **"DharaMitra- Developing livelihood oppurtunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing"** हि योजना प्रस्तावित केली . या प्रस्तावास जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal (Committee PAC) बैठकीमध्ये सदर योजना सन २०१९-२० व सन २०२०-२१ करिता राबविण्यासाठी एकूण ९८.५६ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भादिन पत्र क्र १. अन्वये मंजुरी देऊन संदर्भादिन पत्र क्र.२ अन्वये निधीचा पहिला हप्ता वितरित केला आहे. सदर निधी संदर्भादिन पत्र क्र.३ अन्वये आयुक्त,आदिवासी विकास नाशिक,यांना वितरित केला आहे.

४ धरामित्र हि एक ना नफा ना तोटा तत्वावर काम करणारी संस्था आहे. सदर संस्था सन १९९२ पासून महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड या राज्यांमध्ये कामकाज करते. उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीचा उपयोग करून तसेच पर्यावरण अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागातील लोकांचा चिरंतर विकास करणे हे या संस्थेचे उदिष्ट आहे. धरामित्र ही संस्था जल संवर्धन,कृषि विकास ,आरोग्य, अपारंपरिक ऊर्जा , आजीविका या बाबत कामकाज करते. जलयुक्त शिवार या कार्यक्रमासाठी धरामित्र संस्थेने प्रशिक्षण संस्था म्हणून कामकाज केले आहे. धरामित्र संस्थेनुसार महाराष्ट्र शासनाने या संस्थेला watershed व्यवस्थापनासाठी Mother NGO म्हणून संबोधले आहे. ही संस्था कृषि व उपजीविका या बाबत श्रोत संस्था म्हणून कामकाज करते. सबब, या क्षेत्रामध्ये कामाचा अनुभव असलेल्या संस्थेमार्फत आदिम जमाती अंतर्गत मंजूर "DharaMitra- Developing livelihood opportunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing" हि योजना धरामित्र या संस्थेमार्फत राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय-

वर्धा जिल्ह्यात असणा-या कोलाम या आदिम जमतीच्या कुटुंबीयांना कुक्कुटपालन आणि शेळीपालन सारखी उपजीविकेची माध्यमे उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे या कार्यक्रमार्तंगत **"DharaMitra- Developing livelihood opportunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing"** ही योजना आदिवासी विकास विभाग व धरामित्र संस्था यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.९८.५६ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक-१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११५५८३६८९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.08.31 16:04:54 +05'30'

(संतोष जाधव)
कक्ष अधिकारी

प्रत,

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. स्वीय सहायक,मा. सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास ,नागपूर.
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,नागपुर
९. धरामित्र ,संस्था प्रतिनिधी
१०. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई

आदिम जमाती विकास कार्यक्रमा अंतर्गत - सन २०१९-२०

परिशिष्ट-१

१.	योजनेचे नाव	"DharaMitra- Developing livilihood oppurtunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing"
२.	योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र	वर्धा जिल्ह्यातील आर्वी आणि वर्धा तालुक्यातील गावे
३.	वित्तीय तरतूद	<table><tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>योजना</th><th>निधी (रू.लक्ष)</th></tr><tr><td>१</td><td>२०१९-२०</td><td>"DharaMitra- Developing livelihood opportunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing"</td><td>९८.५६</td></tr></table>
४.	या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक	**एकूण खर्च -रु. ९८.५६ लक्ष** **योजनेच्या अनुषंगाने होणा-या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक परिशिष्ट क्र.०२ मध्ये जोडले आहे**
५.	योजना राबवणारी यंत्रणा	प्रकल्प अधिकारी ए.आ.विकास प्रकल्प नागपूर/वर्धा व धरामित्र संस्था, वर्धा.
६.	नियंत्रक अधिकारी	अप्पर आयुक्त,आदिवासी विकास ,नागपूर
७	योजनेचा उद्देश/ हेतु	➢ वर्धा जिल्ह्यातील कोलम या आदिम जमातीसाठी कुक्कुटपालन आणि शेळीपालन सारखी उपजीविकेची माध्यमे उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे. ➢ कुक्कुटपालन आणि शेळीपालन प्रकल्पातून कौटुंबिक उत्पन्नवाढीसाठी सुधारित शास्त्रीय पद्धतीचे प्रशिक्षण देणे . ➢ कुक्कुटपालन आणि शेळीपालन करणाऱ्या कुटुंबाचा उत्पादक संघ (Federation) करून बाजारपेठ उपलब्ध करून देणे.
८	योजनेच्या अंमलबजानीची कार्यपद्धती	➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने धरामित्र ही संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणुन कामकाज करेल. ➢ सदर योजनेची अंमलबजावणी ही वर्धा जिल्ह्यातील आर्वी आणि वर्धा तालुक्यातील कोलम जनसंख्या एकावटलेल्या गावांमध्ये केली जाईल. ➢ सदर गावांची निवड अंमलबजावणी यंत्रणा प्रकल्प अधिकारी यांच्या मदतीने तातडीने पूर्ण करतील. ➢ **योजना अंमलबजावणीतील विविध टप्पे पुढिल प्रमाणे -** **टप्पा १: लाभार्थी निवड -** ➢ योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या गावांमधून कोलाम जनजातीच्या लाभार्थ्यांची निवड केली जाईल.

		➢ लाभार्थ्यांच्या सहमतीनुसार बकरीपालन व कुक्कुटपालन लाभार्थी निवडले जातील. ➢ योजनेसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांनी बकरीपालन व कुक्कुटपालनासाठी शासनाच्या अन्य योजनेतुन लाभ घेतला नाही याची खात्री प्रकल्प अधिकारी यांनी करण्यात यावी. ➢ निवडलेल्या गावांमध्ये सद्यस्थितीत बकरी पालन व कुक्कुटपालन करत असलेल्या शेतक-यांचे मॅपिंग केले जाईल ➢ योजनेच्या अनुषंगाने कुक्कुटपालनासाठी ३९० लाभार्थी (प्रत्येकी ५ कोंबड्या), breeding फार्म साठी १० लाभार्थी, शेळी पालनासाठी २५० लाभार्थी (प्रत्येकी २ शेळ्या), बोकड पालनासाठी १५० लाभार्थी असे एकूण ८०० लाभार्थी निवडले जातील. ➢ लाभार्थ्यांची निवड करताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात. १) लाभार्थी हा कोलाम या आदिम जमातीचा असावा. २) लाभार्थी हा अपंग,विधवा/परित्यक्ता महिला व भुमिहीन असेल तर त्याला प्राधान्य देण्यात यावे. **टप्पा २: जनजागृती आणि क्षमता बांधणी** ➢ लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेमार्फत योजनेबाबत निवडलेल्या गावांमध्ये ,सभा,मेळावे,भेटी-गाठी या माध्यमांतून जनजागृती केली जाईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून गाव पातळीवरील साधन व्यक्तींची क्षमता बांधणी केली जाईल. ➢ प्रत्येक २ गावांकरिता १ साधन व्यक्ती अंमलबजावणी यंत्रणेमार्फत पारदर्शक पद्धतीने नियुक्त केले जातील. ➢ नियुक्त केलेल्या साधन व्यक्तींना आवश्यक असणारी साधन सामग्रीचा (रजिस्टर , प्रशिक्षण साहित्य,माहिती पुस्तिका व इतर आवश्यक साहित्य) पुरवठा केला जाईल. ➢ **सदर साधन व्यक्तींच्या मदतीने गाव पातळीवर शेळी पालन व कुक्कुट पालन करणा-या व्यक्तींची खालील बाबींवर क्षमता बांधणी केली जाईल**. १) कुक्कुटपालन आणि शेळी पालनाच्या सुधारित पद्धती अवलंबणे २) कमी किंमतीचा निवारा तयार करणे. ३) Azolla Pits आणि हिरवा चारा या विषयी प्रबोधन करणे. ४) हिरव्या चाऱ्यासाठी झाडांची लागवड करण्याबाबत मार्गदर्शन करणे . ५) लसीकरण, आरोग्य सुविधा, योग्य आहार, या बाबत मार्गदर्शन करणे . ६) चांगल्या गुणवत्तेच्या पशूंची खरीदी करण्यासाठी उत्तेजन देणे. ७) पशूंची योग्य ती निगा व काळजी या बाबत प्रशिक्षण देणे . ➢ योजनेच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची क्षमता बांधणी झाल्यानंतर शेळी पालनासाठी व कुक्कुटपालनासाठी योग्य तो निवारा तयार झाल्यानंतरच लाभार्थ्यांना शेळी व कोंबड्यांचे वाटप केले जाईल. ➢ कुक्कुट पालन करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी प्रथम breeding फार्म करिता निवडल्या गेलेल्या १० लाभार्थ्यांना योजनेच्या अनुषंगाने फायदा दिला जाईल. breeding फार्म साठी होणाऱ्या खर्चाचे सविस्तर सोबतच्या परिशिष्ट ०३ मध्ये जोडले आहे

		➢ इतर ३९० लाभार्थ्यांसाठी कुक्कट पालनासाठी आवश्यक असलेल्या कोंबड्यांच्या ४-६ आठवडे वयाच्या पिल्लांची पूर्तता सदर Breeding फार्म मध्ये तयार झालेल्या पिल्लांमधून केली जाईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने प्रत्येक गावात समितीची (उत्पादक गटाची) स्थापना करण्यात येईल. ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शेळीपालन व कुक्कुटपालन करणा-या लाभार्थ्यांचे (उत्पादक गटाचे) फेडरेशन (प्रत्येकी एक) तयार करण्यात येईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने निवड केलेल्या प्रत्येक गावांमधून फेडरेशन मध्ये प्रतिनिधित्व असेल. ➢ तयार करण्यात आलेल्या फेडरेशनमधील सदस्यांची क्षमता बांधणी करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. ➢ तयार केलेल्या फेडरेशनच्या माध्यमातून विपणन, व्यवस्थापन, समन्वय इत्यादी कामे केली जाईल. ➢ उत्पादक गटांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी तसेच बँक आणि शासकीय संस्थांबरोबर जोडण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा व फेडरेशन हे कामकाज करेल .
९	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) सदर योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने उपलब्ध मंजूर निधीतच योजना पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. योजनेसाठी मंजूर निधीच्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त निधी अमलबजावणी यंत्रणेला उपलब्ध करून दिला जाणार नाही. २) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. ३) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल. ४) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समिती/शासनाच्या मान्यतेनेच बदल करावा. ५) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल. ६) योजनेच्या अनुषंगाने पुरवठा करण्यात येणाऱ्या बकरी व कोंबडी ह्या निरोगी चांगल्या वाणाच्या व परिस्थितीला जुळवून घेणा-या असाव्यात . ७) पुरवठा करण्यात येणा-या बक-यांचा विमा करणे , योजनेच्या कार्यकाळात लसीकरण , आरोग्य सेवा पुरविणे, पूरक आहार व पोषण पुरविणे , निवारा तयार करणे ह्या बाबींची पूर्तता करणे अंमलबजावणी यंत्रणेला बंधनकारक राहील. ८) योजनेच्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणा व प्रकल्प अधिकारी यांनी लाभार्थी निवड प्रक्रिया राबविताना सुयोग्य पारदर्शक पद्धतीचा अवलंब करावा. ९) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. १०) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

		११) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील. १२) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.
	सनियंत्रण व मूल्यमापन समिती	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.** १. प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प, नागपुर /वर्धा - **अध्यक्ष** २. सबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -**सदस्य** ३ . धरामित्र संस्था , प्रतिनिधी - **सदस्य** ४.सबंधित सहाय्यक प्रकल्प अधिकारी, केंद्रीय योजना - **सदस्य सचिव** ➢ योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासन / आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील. ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.
१०	**योजनेची अंमलबजावणी चा कालावधी**	**योजनेचा एकुण कालावधी** - योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित झाल्यापासून पुढील ०१ वर्ष
११	**निधी वितरणाची कार्य पद्धती**	सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे. ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी घ्यावी ➢ सदर योजनेचा निधी हा आयुक्त,आदिवासी विकास नाशिक, यांच्या मार्फत प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प नागपूर यांना वर्ग करण्यात करण्यात येईल. ➢ सदर निधी प्राप्त होताच प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प नागपूर/वर्धा हे अंमल बजावणी यंत्रणेला कार्याचा आदेश देऊन प्रकल्पाच्या सुरुवातीला मंजूर रकमेच्या ४० टक्के निधी वर्ग करतील . ➢ सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल .

		➢ प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व प्रकल्प कार्यालयाच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर पुढील ४० टक्के निधी वर्ग करण्यात येईल. ➢ उर्वरित २० टक्के निधी हा योजनेची अमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर व कार्य पूर्तता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर व मूल्यमापण व सनियंत्रण समितीने समाधानकारक शिफारस केल्यानंतर अमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमल बजावणी यंत्रणेची राहील . ➢ योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन , प्रवास, सभेचा खर्च तसेच इतर तस्तम खर्च) वेळोवेळी प्रकल्प कार्यालय नागपूर यांना सादर करण्याची जबाबदारी योजना राबवणाऱ्या यंत्रणेची राहील .
	योजनेची फलनिष्पती	कोलम समाजातील कुटुंबांना सुधारित पद्धतीने कुक्कुटपालन आणि शेळीपालन करण्यास सहकार्य करून कौटुंबिक उत्पन्न वाढवणे.

परिशिष्ट -०२

योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक खालील प्रमाणे

अ.नं	बाब	संख्या	मासिक खर्च (रु)	युनिट	निधी तरतूद (रु)
१	प्रकल्प संचालक (अर्धवेळ)	१	७,०००	१२ महिने	८४,०००
२	प्रकल्प समन्वयक	१	२०,०००	१२ महिने	२,४०,०००
३	तज्ञ (उपजीविका)	१	२५,०००	१२ महिने	३,००,०००
४	पशु डॉक्टर (सल्लागार)	१	६,०००	१२ महिने	७२,०००
५	गट समन्वयक	३	१८,०००	१२ महिने	६,४८,०००
६	गाव स्तरावरील साधन व्यक्ती (२ गावांसाठी १ व्यक्ती)	१०	२,०००	१२ महिने	२,४०,०००
मानव संसाधन एकूण खर्च					**१५,८४,०००/-**
जनजागृती व क्षमता बांधणी-					
७	गाव पातळीवरील जनजागृती आणि सभा	२२	--	--	१२,७५०
८	साधन व्यक्तींचे प्रशिक्षण	२	५०,०००	--	१,००,०००
९	साधन सामग्री (गाव साधन व्यक्तींसाठी)	१०	२५००	१० नग	२५,०००
१०	उजळणी प्रशिक्षणे	२	६०००	--	१२,०००
११	गट प्रशिक्षण (कुक्कुटपालन आणि शेळीपालन)	४	६०००	--	२४,०००
१२	क्षेत्र भेटी - कुक्कुटपालन (३० सहभागी)	१	३०,०००	--	३०,०००
१३	क्षेत्र भेटी -शेळीपालन (३० सहभागी)	१	३०,०००	--	३०,०००
१४	क्लस्टर लेवेल फेडरेशनसाठी निधी	२	२,५०,०००	--	५,००,०००
शेळी पालन					
१५	निवारा तयार करणे	४००	३,०००	--	१२०००००
१६	पूरक आहार आणि पोषण पुरविणे	४००	५००	--	२०००००
१७	बोकड खरेदी	१५०	४,४००	--	६,६०,०००
१८	शेळी खरेदी (२ शेळ्या प्रति एकक)	२५० एकक	१४,०००	५०० शेळ्या	१,७५,००००
१९	वजनकाटे	२२	३,०००	--	६६,०००
२०	लसीकरण आणि आरोग्य सेवा	४००	५००	--	२०००००
कुक्कुटपालन					
२१	निवारा तयार करणे	३९०	२,०००	--	७,८०,०००
२२	पूरक आहार आणि पोषण	३९०	५००	--	१,९५,०००
२३	कोंबडीची पिल्ले खरेदी (५ पक्षी प्रति एकक)	३९०	३७५	--	१,४६,२५०
२४	लसीकरण आणि आरोग्य सेवा	३९०	५००	--	१,९५,०००
२५	Breeding फार्म उभारणे	१०	१,२५,०००	--	१२,५०,०००
	एकूण	--			**८९,६०,०००**

२६	संस्थात्मक खर्च (८ %)				७,१६,८००/-
२७	मुल्यमापन व सनियंत्रण खर्च (२%)	--			०१,७९,२००/-
	एकूण खर्च				**९८,५६,०००**

परिशिष्ट ०३- Breeding फार्म करिता होणाऱ्या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक खालील प्रमाणे

अ.क्र	बाब	युनिट	प्रती यूनिट खर्च	एकूण खर्च
अ	भांडवली खर्च			
१	कुंपनासाठी जाळी	२०० रनिंग मीटर	१५०	३०,०००/-
२	परिसर विकास (कंपोस्ट पिट, अझोला पिट , रेस्ट शेड ईत्यादी)			१०,०००/-
३	शेड तयार करणे (२५*८ फुट)	५०० वर्ग फुट		५०,०००/-
४	इतर आवश्यक साहित्य (i.e. Egg Laying box, Feeders, Waterier)			५,०००/-
५	इनवर्टर आणि cold सिस्टिम	१	१००००	१०.०००/-
	एकूण (अ)			**१,०५,०००/-**
ब	**आवर्ती खर्च**			
१	अंडी देणाऱ्या कोंबड्या (८ महीने)	३० कोंबड्या	३००	९,०००/-
२	कोंबडा	१० कोंबडे	४००	४,०००/-
३	पूरक खाद्य	५०० किलो	४०	२०,०००/-
४	औषधे व लसीकरण	--	--	४,०००/-
५	इतर आनुषंगिक येणारा खर्च	--	--	१,०००/-
	एकूण (ब)			**२०,०००/-**
	एकूण खर्च (अ+ब)			**१,२५,०००/-**